भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

CV 562715

SUB TREASURY OFFICE NIPHAD

28 JUN 2010

S.T.O. NIPHAD

क परवाना क्रमांक ७७/२००३ मु. वि. ठि. लासलगाव

मु.वि.अ.नं. ......१०४६१९......दिनांक २/७/२०१०

मु. कि. रुपये ......१००......पैकी मु. रुपये ......१००......

मु. घे. नांव सौ. कविता नेमीचंद चोरडिया

रहाणार डोंबिवली, भागशाळा मैदान, मुंबई वेस्ट.

K. N. Chordiya

सही./अंगठा

जाधव सी. ए.
मुद्रांक वि. लासलगाव

–॥ श्री ॥–

**॥ फरोक्त खरेदीखत ॥** (जनरल स्टॅम्प रू. 100)

मौजे विंचूर, ता.निफाड, जि.–नाशिक येथील शिवारातील व हद्दितील गट नं. 470/3/2 मधील पोतनीस पार्क मधील आर.सी.सी. बांधीव बंगला नं.1 व जागेचे फरोक्त खरेदीखत आजचे चालु बाजार भावाने किंमत रक्कम रूपये ७,००,०००/– (अक्षरी रक्कम रूपये सात लाख मात्र) चे कायमचे फरोक्त खरेदीखत आज वार शुक्रवार दि. 16 जुलै 2010 ते दिवशी लासलगाव मुक्कामी....

K. N. Chordiya

.....२....

| | | |
|---|---|---|
| श्री.निलेश दिलीपचंद बोथरा, वय-26<br>व्यवसाय - व्यापार, रा.विंचूर,<br>ता.निफाड, जि.नासिक | } | लिहून घेणार |

यांसी.....

| | | |
|---|---|---|
| सौ.कविता नेमिचंद चोरडीया, वय-35<br>व्यवसाय- घरकाम, रा.डोंबिवली,<br>भागशाळा मैदान, डोंबिवली वेस्ट, मुंबई | } | K. N. Chordiya<br>लिहून देणार |

कारणे बंगल्याचे कायमचे फरोक्त खरेदीखत लिहुन देतो ऐसा जे कि ,

१) मिळकतीचे वर्णन :- तुकडी जिल्हा नासिक पोट तुकडी तालुका निफाड पैकी मौजे विंचूर ग्रामपंचायत हद्दीतील तसेच शिवारातील बंगला मिळकत तळजागेसह .

| गट नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| 470/3/2 | 3 | 172.50 |
| 470/3/2 | 4 | 172.50 |
| | एकुण - | 345.00 चौ.मी. |

सदरचे प्लॉट नं. 3 व नं. 4 चे एकुण क्षेत्रफळ 345.00 चौ.मी.मध्ये आर.सी.सी. मध्ये बांधकाम केलेले तीन बंगले बांधलेले असून त्यापैकी तुम्हांस फरोक्त खरेदी देणेचे ठरलेले प्लॉट नं. 3 पैकी बंगला नं. 1 यांसी ग्रामपंचायत मिळकत नंबर 1725/17 यांसी बांधवी क्षेत्रफळ - 66.83 चौ.मी. असून बंगल्याशेजारील बखळ जागा 48.17 चौ.मि. आहे. असे दोन्ही मिळून तुम्हांस खरेदी देणेचे ठरलेले एकुण क्षेत्रफळ - 115.00चौ.मि. ( बांधिव बंगला व बखळ जागा )



Scanned with OKEN Scanner

यासी चतु:सिमा खालील प्रमाणे :-

पुर्वेस :- कॉलनी रस्ता. दक्षिणेस :- कॉलनी रोड

पश्चिमेस :- प्लॉ.नं. 2 उत्तरेस :- बंगला नं. 2

सदर मिळकतीचे जाणे येण्याचे ले-आऊटप्रमाणे कॉलनी रस्त्याचे तसेच ओपन स्पेस वापरण्याचे हक्कांसह तसेच सदर मिळकतीत जल, तरू, काष्ठ,पाषाण, निधी निक्षेप, दगडगोटे, झाड झडोरा, पाला पाचोळा तसेच जाणे-येण्याचे वागवहिवाटीच्या इजमेंटचे हक्कासह तदंगभूत दरोबस्त अशी मिळकत.

सदरचे मिळकतीमध्ये असलेल्या कॉलनी रस्त्यांचे सामाईक वापराचे हक्कांसहीत दरोबस्त मिळकत असून सदरचे मिळकतीमध्ये पाणीपुरवठा ,वीजपुरवठा,ड्रेनेज ,ॲप्रोचे रोड,तसेच इतर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध आहेत.सदर मिळकतीतील येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत, आणि सदर मिळकतीमध्ये जाण्या येण्याचे वागवहिवाटीचे हक्कांसह व इतर सर्व इजमेंन्टरी राईटसह दरोबस्त मिळकत.

सदर मिळकतीत असलेल्या बंगल्याची लांबी व रूंदी ही बांधकाम नकाशाप्रमाणे असून प्लॉटमधील असलेल्या सामाईकांतील सर्व सोयी सुविधांसह तसेच आतील इले. मिटरसह तसेच ग्रामपंचायतीचे पाण्याचे नळ कनेक्शनसह. तसेच आतील दरवाजा, खिडक्या, संडास, बाथरूम तसेच किचन, बेडरूम व इतर असलेल्या सर्व चिजवस्तुसहीत दरोबस्त मिळकत.

वर कलम नं. 1 यात वर्णन केलेली मिळकत ही मे.दुय्यम निबंधक सो., लासलगांव यांचे कार्यालयात दस्त क्रं. 1033/2010 अन्वये रक्कम रूपये 14,000/- रू मात्रचे स्टॅम्पपेवर लिहून घेणार व देणार यांचेत नोंदविलेले आहे.

२) वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत हि मे.उपविभागीय अधिकारी सो.भाग निफाड यांचे कडील आदेश क्र. एन.ए.एस.आर.९७/२००१ दि.१०-०९-२००१ अन्वये बिनशेती मंजुरी देण्यात आलेली आहेत.तसेच महाशय टावून प्लॅनिंग नं. अभिन्यास विंचूर स.स.नं. ३०४४ तारीख १९-०९-२००१ अन्वये ले आऊट मंजुरी देण्यात आलेली आहेत.ने बिनशेती हुकुमातील शर्ती व अटी प्रमाणे तुम्ही बिनशेती प्लॉट चा उपभोग हा घ्यावयाचा आहे.मिळकत ही माझी स्वकष्टार्जीत खरेदी मालकीची असून ती माझे प्रत्यक्ष कब्जा वहिवाटीत व उपभोगातील मिळकत आहे. सदर मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटला माझे नांव मालक सदरी दाखल झालेले आहे. सदर मिळकतीचे मी कायदेशीर मालक असून सदर मिळकतीशी माझ्याशिवाय इतर दुसरे कोणाचाही काहीएक हक्क, हितसंबंध अगर कब्जा, संबंध काहीही नव्हता व नाही. सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची अशी मिळकत असून सदर मिळकत विक्री / हस्तांतर करण्याचा मला संपूर्णपणे कायदेशीर हक्क व अधिकार आहे. मी कुटूंबासह डोंबेवली मुंबई येथे वास्तव्य करत असल्यामुळे सदर मिळकतीची मला काहीही

गरज नाही .त्यामुळे मी वर कलम १ यांत वर्णन केलेला बंगला मिळकत कायमचे विक्रीस काढली याची तुम्हास माहिती झालेवरून तुम्ही सदर बंगला मिळकत विकत घेण्याची इच्छा दर्शविल्यावरून तुमचे व आमच्या दरम्यान बोलणी व बैठक झाली.

सदर बंगला मिळकत मी तुम्हास कायम फरोक्त खरेदी देण्याचा व तुम्ही खरेदी घेण्याचा पक्का सौदा / व्यवहार ठरला व सदर सदर बंगला मिळकत मी तुम्हास कायम फरोक्त खरेदी देण्याचा व तुम्ही खरेदी घेण्याचा पक्का सौदा / व्यवहार ठरला मिळकत मी तुम्हास एकूण रक्कम रूपये 7,00,000/- (अक्षरी रूपये सात लाख रूपये) मात्र ऐवजी कायमची फरोक्त खरेदी देण्याचे ठरले व त्या व्यवहारात ठरलेल्या अटी व शर्तीनुसार मी तुम्हास सदरचे फरोक्त खरेदीखत आज रोजी लिहून देत आहे.

३) वर कलम १ यांत वर्णन केलेली बंगला मिळकतीचे तुम्ही या खरेदीखतानंतर पुर्ण मालक होणार असून सदर बंगला मिळकतीचा उपभोग घ्यावा अगर तुमचे इच्छेप्रमाणे, मर्जीप्रमाणे बंगला मिळकतीचा मालकी हक्काने विक्री, विल्हेवाट करावी. मी अगर माझे तर्फे कोणीही तुमचे मालकी हक्कांस, हरकत, अडथळा करणार नाही व तसा मला अगर माझे तर्फे वंशवारस हक्क व अधिकार सांगणार नाही.

४) उपरोक्त वर कलम १ यांत वर्णन केलेल्या बंगला मिळकतीचा तुम्ही या खरेदीखतानंतर मालकी हक्काने उपभोग घ्यावा. सदर बंगला मिळकतीचा खुला व प्रत्यक्ष कब्जा हा तुम्हास सदर बंगल्यात मिळकतीवर जावून मिळकतीच्या चतु:सिमा दाखवून दिलेला आहे.

५) सदर बंगला मिळकत तुम्हास निर्वेध व बिनबोजाची अशी कायम फरोक्त खरेदीने द्यावयाची असून, सदर बंगला मिळकतीवर कोणत्याही बँकेचा, सोसायटीचा, संस्थेचा, फायनान्स कंपनीचा अगर इतर कोणाचाही कोणताही बोजा नाहीत. सदरील बंगला मिळकतीवर या आधीचे काही बोजे आढळल्यास त्याचे निवारण मी माझ्या पदरखर्चाने करून देईन. तुम्हास त्याची तोषिस लागू देणार नाही.

६) सदर बंगला मिळकत इतर कोणासही विक्री करण्याचा करार केलेला नाही. सदर मिळकतीवर कोणाचेही हक्क व अधिकार नाहीत. सदर मिळकत इतर कुणाकडे गहाण, दान, लिज, लिन, बक्षीस, जामीनकी, कोर्ट जप्ती, मनाई, दावा, वहिवाट, मृत्यूपत्र, साठेखत, तारण, लेखी अगर तोंडी करार मदार, अन्नवस्त्र अगर अन्य कोणत्याही जडजोखमांत गुंतवीलेली नव्हती व नाही.

७) सदर बंगला मिळकत इतर कोठेही ॲक्वायर अगर रिक्वायर झालेली नव्हती व नाही व तशा स्वरूपाच्या कोणत्याही नोटीसा अद्याप मला मिळालेली नाहीत.

८) सदर बंगला मिळकत तुम्हास कायमची अशी फरोक्त खरेदी दिली असून

.....५.....

Scanned with OKEN Scanner